## बी ए भाग १ / बी कॉम भाग १

आवश्यक आनुषंगिक निवड (CGE-2)मराठी (अभ्यासपत्रिका -ब)

### सत्र २ : Semester - 2

### पाठ्यपुस्तक : शब्दसंहिता

### शैक्षणिक वर्ष - २०२१-२०२२

### प्रश्नसंच

---

प्रश्न १) योग्य पर्याय निवडा.

१) शहरातील कोणती गोष्ट आपल्याला भेदता येत नाही असे कबी एकनाथ पाटील 'शहर: एक उदास पोकळी' या कवितेत म्हणतात ?

(अ) पोकळी (ब) चक्रव्यूह (क) उदास पोकळी (ड) शहरी संस्कार

२) कवीला स्वतःचाच स्वतःला केव्हा संताप येतो असे कवी एकनाथ पाटील 'शहर: एक उदास पोकळी' या कवितेत म्हणतात?

(अ) मागे वळण्याच्या वाटा खुडल्या जातात तेव्हा

(ब) जागरणामुळे माझ्यातला मी हरवून जातो तेव्हा

(क) बिनचेहऱ्याची भावनाहीन चौकट दिसते तेव्हा

(ड) गाव सामावून घेत नाही तेव्हा

३) आता आपल्याला मागे वळता येत नाही, असे कवी एकनाथ पाटील 'शहर एक उदास पोकळी' या कवितेत म्हणतात ?

(अ) कारण गाव तुटले व शहर सामावून घेत नाही.

(ब) कारण जन्मजात संस्कार वळू देत नाहीत.

(क) कारण उदास पोकळी सापडत नाही.

(ड) कारण गाव व शहर नजरेपल्याड राहिले आहे.

४) आपण गावातून शहराकडे का फेकले गेलो असे कवी एकनाथ पाटील 'शोधयात्रा' या कवितेत म्हणतात ?

(अ) गरजेपोटी (ब) फसव्या भोवऱ्यापोटी

(क) जगता येत नाही म्हणून (ड) शोधयात्रेसाठी

५) पत्नीच्या पोतेऱ्याने कोणती गोष्ट लाल होते, असे कवी विंदा करंदीकर 'झपताल' या कवितेत म्हणतात ?

(अ) नवी चूल (ब) गोबर चूल (क) म्हातारी चूल (ड) जुनी चूल

६) उगवता सूर्य दोरीवर काय वाळवतो असे कवी विंदा करंदीकर, 'झपताल' या कवितेत म्हणतात?

(अ) तीन मुतेले (ब) तीन दुपटी (क) नवी साडी (ड) शालु

७) पत्नीच्या पायांमध्ये काय लुडबुडत असतात असे कवी विंदा करंदीकर,'झपताल' या कवितेत म्हणतात ?

(अ) मांजर (ब) पतीचे विचार (क) बाळे (ड) पतीची

८) पत्नीची प्रतिबिंबे कशात रेंगाळत असतात असे कवी बिंदा करंदीकर,'झपताल' या कवितेत म्हणतात ?

(अ) वस्तूंमध्ये (ब) आरशामध्ये (ब) कवडशामध्ये (ड) मनामम

९) आपली पत्नी स्वागतासाठी कोण असते असे कवी विंदा करंदीकर या कवितेत म्हणतात ?

(अ) यक्षिणी (अ) सुहासिनी (ब) पक्षिणी (ड) संहिता

१०) आपली पत्नी जेवण भरवताना कोण असते असे कवी विंदा करंदीकर 'झपताल' या कवितेत म्हणतात?

(अ) सुहासिनी (ब) पक्षिणी (ब) यक्षिणी (ड) संहिता

११) आपली पत्नी साठवण करताना कोण असते असे कबी विंदा करंदीकर 'झपताल' या कवितेत म्हणतात?

(अ) सुहासिनी (ब) पक्षिणी (ब) यक्षिणी (ड) संहिता

१२) आपली पत्नी भविष्याकरिता कोण असते असे कवी विंदा करंदीकर 'झपताल'या कवितेत म्हणतात ?

अ)सुहासिनी (ब) स्वप्नसती (ब) यक्षिणी (ड) संहिता

१३) पत्नीची कोणती किमया आपल्याला अजून समजली नाही,असे कवी विंदा करंदीकर 'झपताल' या कवितेत म्हणतात ?

(अ) दहाफुटी खोलीत दिवसाच्या २४ मात्रा ती कशी बसवते

(ब) दहाफुटी खोलीत लहान बाळ कसे सांभाळते

(क) दहाफुटी खोलीत ती म्हातारी चूल कशी पेटवते

(ड) दहाफुटी खोलीत बाळुती कशी वाळवते

१४) "संसाराच्या दहाफुटी खोलीत दिवसाच्या २४ मात्रा चपलखपणे बसवणारी तुझी.......... मला अजुनही समजलेली नाही" असे कवी विंदा करंदीकर 'झपताल' या कवितेत म्हणतात.

(अ) गंमत (ब) युक्ती (क) किमया (ड) जादू

१५) विंदा करंदीकर यांच्या 'शब्दसंहिता' मध्ये अभ्यासाला असलेल्या कवितेचे नाव पुढीलपैकी कोणते आहे ?

(अ) झपताल (ब)त्रिताल (क)एकताल (ड) षट्ताल

१६) 'गोधड' या कवितेत कवी कोणत्या वासाने नाक खालीवर करत राहिला ?

अ) कुबट वासाने (ब) आंबट वासाने (क) घामट वासाने (ड) खारट वासाने

१७) आपली गोधड कशाने भिजत गेली असे कवी 'गोधड' या कवितेत म्हणतात ?

(अ) पावसाने (ब) चिखलाने क) मातीने ड) अश्रूंनी

१८) आपल्या गोधडीचा आंबट वास आपल्याला कशाची आठवन करून देतो असे वाहरू सोनवणे आपल्या 'गोधड' या कवितेत म्हणतात?

(अ) आईच्या कुशीची (ब) पूर्वजांच्या दुःखांची (क) आईच्या सावलीची (ड) पूर्वजांच्या रडण्याची

१९) पुढीलपैकी कोणती कविता वाहरू सोनवणे यांची आहे ?

(अ) गोधड (ब) झपताल (क) आग आणि फुफाटा (ड) फाटकी गोधड

२०) 'चळवळ' म्हणजे काय नव्हे असे कवी वाहरू सोनवणे 'चळवळ म्हणजे काय' या कवितेत म्हणतात ?

(अ) दोन-पाच दिवसांची जत्रा (ब) केवळ एक यात्रा (क) माणुसकीचा गाभा (ड) विकसित प्रवाह

२१) 'चळवळ' म्हणजे काय आहे? असे कवी वाहरू सोनवणे, 'चळवळ म्हणजे काय या कवितेत म्हणतात ?

(अ) झुरुमुरु प्रवाह (ब) आटलेला प्रवाह (क) नदीला आलेला पूर (ड) विकसित प्रवाह

२२) ‘नदीचा प्रवाह काय करतो’ असे कवी वाहरू सोनवणे 'चळवळ म्हणजे' या कवितेत म्हणतात ?

(अ) लहानमोठ्याना जोडतो (ब) लहानमोठ्यांना बिलगतो

(क) उन्हाळ्यात सुकतो (ड) दगडात थांबतो

२३) 'चळवळ म्हणजे असा प्रवाह की जो...... ‘ असे कवी वाहरू सोनवणे’ ‘चळवळ म्हणजेकाय' या कवितेत म्हणतात ?

(अ) उन्हाळ्यात सुकतो (ब) दगडात अडकतो (क) थांबत नाही ड)असमानता करतो

२४) चळवळीचा प्रवाह कुठल्या दिशेने जातो असे कवी वाहरू सोनवणे 'चळवळ म्हणजे काय’ या कवितेत म्हणतात ?

(अ) खडकचट्टानांच्या (ब) समतोल महासागराच्या

(क) असमतोल महासागराच्या (ड) वळणावळणाच्या

२५) चळवळीच्या प्रवाहाला कशाचा ध्यास असतो असे कवी वाहरू सोनवणे 'चळवळ म्हणजे' या कवितेत म्हणतात ?

(अ) खडकचट्टानांचा (ब) नदीच्या प्रवाहाचा (क) समतोलाकडे जाण्याचा (ड) असमानतेकडे जाण्याचा

२६) त्याला सतत काय सिद्ध करायचं आहे असे प्रज्ञा दया पवार "माणसासारखा माणूस असूनही" या कवितेत म्हणतात ?

(अ) तिची धिंड काढणे (ब) स्वतःच पौरुषत्व सिद्ध करणे (क) तिला चाबकाने फोडून काढणे (ड) शांत बसणे

२७) त्याने घरात काय लटकावले आहे असे प्रज्ञा दया पवार "माणसासारखा माणूस असूनही" या कवितेत म्हणतात ?

(अ) महामानवांच्या तसबिरी (ब) बंदूक (क) त्याची मेडल्स (ड) स्व-प्रतिमा

२८) त्याची स्व-प्रतिमा कशी आहे असे प्रज्ञा दया पवार "माणसासारखा माणूस असूनही" या कवितेत म्हणतात?

(अ) घासलेली पुसलेली (ब) धुरकटलेली (क) सुसंस्कृत सालस (ड) क्रांतिकारी

२९) त्याच्या डोळ्यात ती काय वाचू शकते असे प्रज्ञा दया पवार ‘माणसासारखा माणूस असूनही" या कवितेत म्हणतात ?

(अ) गीत भावनांचे (ब) तिच्याबद्दलचे प्रेम (क) नृशंस हिंसा (ड) त्याचे अपार दुःख

३०) ती काय जाणू शकते असे प्रज्ञा दया पवार 'माणसासारखा माणूस असूनही’ या कवितेत म्हणतात ?

(अ) तिच्याबद्दलचे प्रेम (ब) गीत भावनांचे (क) नृशंस हिंसा (ड) त्याचे अपार दुःख

३१) माणसासारखा माणूस असूनही त्याला कशाची जबर किंमत मोजावी लागते असे प्रज्ञा दया पवार 'माणसासारखा माणूस असूनही या कवितेत म्हणतात?

(अ) पुरुष असल्याची (ब) नृशंस हिंसेची (क) अपार दुःखाची (ड) आतल्या उकळण्याची

३२) त्याला तिची कठोर सत्त्वपरीक्षा कशी पाहायची आहे? असे प्रज्ञा दया ‘माणसासारखा माणूस असूनही' या कवितेत म्हणतात ?

(अ) तिला चाबकाने फोडून काढून (ब) तिला उकळत्या तेलात हात घालायला लावून

(क) तिची नग्न धिंड काढून (ड) तिला विद्रूप करून

३३) आपण काय वाहत आणले आहे ? असे प्रज्ञा दया पवार ‘आग आणि फुफाटा' या कवितेत म्हणतात ?

(अ) वहिवाटेचा निखारा (ब) आदर्शाचा मुखवटा क) अपार दुखः (ड) शालीन पदर

३४) आपण झेंगट हाती घेऊन काय करू असे संत नामदेव म्हणतात ?

(अ) विठ्ठलाची आरती करू (ब) विठ्ठलाला नेवैद्य दाखवू (क) दवंडी पिटू (ड) माघारी जाऊ

३५) हाती झेंगट घेऊन संत नामदेव कोणती दवंडी पिटणार आहेत ?

(अ) मी आता जातो माघारा (ब) तू पतितपावन आहेस (क) तू तुझे ब्रीद सोड (ड) तू मोठा घातकी आहेस

३६) संत नामदेव देवाला काय म्हणत त्याच्या पायाला लागत आहेत ?

(अ) आलो मी द्वारा (ब) जातो माघारा (ब) सोडी ब्रीद देवा आता (ड) प्रेम असो दे चित्ती

३७) पंढरीला जाऊन काय करावे असे संत नामदेव 'पंढरीस जावे' या अभंग म्हणतात ?

(अ) जीवनमुक्त व्हावे (ब) आरती करावी (क) भजन करावे (ड) कीर्तन करावे

३८) पंढरीला जाऊन काय बघावे असे संत नामेदव म्हणतात ?

(अ) चंद्रभागा तीर (ब) श्रीमुख (क) वाळवंट (ड) भजन

३९) पंढरीला जाऊन पांडुरंगाच्या चरणावर काय ठेवावे असे संत नामेदव म्हणतात?

(अ) मस्तक (ब) श्रीफल पुष्प (क) कायावाचामन (ड) दहीभाताची उंडी

४०) आता शिपाई काय करत आहेत असे 'जमाना आला उफराटा' या कवितेत अनंत फंदी म्हणतात?

(अ) लढाई (ब) घोडेस्वारी (क)औत हाकतात (ड) बटकीशी मोहोबत

४१) मुलगा मेहुणीचा लाड करतो आणि बहिणीला काय म्हणतो असे 'जमाना आला उफराटा' या कवितेत अनंत फंदी म्हणतात ?

(अ) रांड (ब) सुंदरी (क) गोड (ड) बेइमान

४२) पाटलाचे मत काय आहे असे 'जमाना आला उफराटा' या कवितेत अनंत फंदी म्हणतात?

(अ) बुडवावी रयत (ब) अशी कलियुगाची रीत (क) शिपाई हाकिती औत (ड) दप्तर पडले सांदीत

४३) कोणी दुनया फार नाडली आहे असे 'जमाना आला उफराटा' या कवितेत अनंत फंदी म्हणतात ?

(अ) शियाने (ब) पाटलाने (क) भटाने (ड) मारबाड्याने

४४) कलीचा बारा आल्याने गरती कोठे जातात असे 'जमाना आला उफराटा' या कवितेत अनंत फंदी म्हणतात?

(अ) परद्वारी (ब) नवतीकडे (क) सैपाकघरी (3) ताथादारी

४५) 'हे मूर्खा खूण तर्का' ही कविता पुढीलपैकी कोणी लिहिली आहे ?

(अ) शाहीर प्रभाकर (ब) शाहीर रामजोशी (क) संत नामदेव (ड) शाहीर अनंत फंदी

४६) शाहीर अनंत फंदी म्हणतात "हे मूर्खा खूण......"

(अ) नर्का (५) बर्का (क) तर्का (ड) फर्का

४७) 'हा बंदा रुपाया आहे असे वाटले पण प्रत्यक्षात काय दिसले', असे अनंत फंदी 'हे मूर्खा खूण तर्का' या कवितेत म्हणतात ?

(अ) तांब्याचा भुरभुरा (ब) फाकड्या तन्हा (क) कस्त झाला चुरा (ड) उमदा हिरा

४८) अंगठीवर सुंदर हिरा आहे असे वाटले पण प्रत्यक्षात काय झाले असे अनंत फंदी 'हे मूर्खा खूण तर्का' या कवितेत म्हणतात ?

(अ) तांब्याचा भुरभुरा (ब) फाकड्या तन्हा (क) कस्त झाला चुरा (ड) पळतसे माघारा

४९) शिकारी ज्याला बंदूक मारत आहे तो वाघ आहे असे वाटले पण प्रत्यक्षात काय होते असे अनंत फंदी 'हे मूर्खा खूण तर्का' या कवितेत म्हणतात ?

(अ) सिंह (ब) वाघीण (क) सुअर (ड) कुत्रे

५०) रस्ता चांगला आहे असे वाटून चालायला सुरुवात केली पण प्रत्यक्षात सामोरे काय आले असे अनंत फंदी हे मूर्खा खूण तर्का' या कवितेत म्हणतात ?

(अ) डॉगर (ब) काटेकुटे (क) कसपट (ड) उकरडा

५१) खूप पाऊस पडला असे कवीला वाटत असतानाच काय घडले असे अनंत फंदी 'हे मूर्खा खूण तर्का' या कवितेत म्हणतात ?

(अ) कस्त झाला चुरा (ब) काडी कसपट नासे (क) व्यर्थच गडगडे (ड) उकर्डा समोर येतेसे

५२) घोडा किमती आहे असे म्हणून पाहायला गेलो तर काय दिसले असे अनंत फंदी 'हे मूर्खा खूण तर्का' या कवितेत म्हणतात ?

(अ) गर्दभच दिसतो (ब) झुरा किमतीचा दिसतो (क) अदा दावितो (ड) मूर्ख सा मज की तो

५३) मानवाच्या मनात कोणते भेद नसावेत असे म. फुले 'मानवांचा धर्म एक मध्ये म्हणतात.

(अ) निर्मिक (ब) धर्म (क) जिव्हाळा (ड) आनंद

५४) आपण कोणती भिक्षा मागतो असे म. फुले 'मानवांचा धर्म एक' मध्ये म्हणतात ?

(अ)सुखसोईसाठी गरगर फेरे(ब) तृणवृक्षभार पाळी (क) सर्व सुखी व्हावे (ड) न्यायाने उपभोग घ्या

५५) "तृणवृक्षभार पाळी आम्हासाठी । फळे ती । छायेसह ।" असे म. फुले 'मानवांचा धर्म एक' मध्ये म्हणतात?

(अ)गोमटी ब) मोठमोठी (क) रसाची (ड) मधुरची

५६) "सत्याचा जिव्हाळा मनाची । चित्तास स्वस्थता । जेथे आहे " असे म. फुले 'धीर' कवितेमध्ये म्हणतात.

(अ) मान्यता (ब) मलीनता (क) स्वच्छता (ड) धीरता

५७) यशवंत कोण होतात असे म. फुले 'धीर' कवितेत म्हणतात?

(अ) ज्यांच्या हृदयात धीर आहे ते (ब) जे सर्वांना सुख देतात से

(क) ज्यांचे मन स्वच्छ आहे ते (ड) ज्यांचे चित्त स्वस्थ आहे

५८) "धीर धरूनीय सर्वा सूख देती .......। जोती म्हणे "

(अ) फळे तो गोमटी (ब) यशवंत होती (क) आरिष्टे पळती (ड) देशोधडी जाती

५९) 'शब्दसंहिता' या पाठ्यपुस्तकातील म. फुले यांच्या कवितेचे नाव पुढीलपैकी कोणते आहे?

(अ) मानवांचा धर्म एक (ब) मानवांचा निर्मिक एक (क) झपताल (ड) फुलराणी

६०) हिरव्या तृणांच्या गालिच्यावर कोण खेळत होते असे बालकवी 'फुलराणी' कवितेत म्हणतात ?

(अ) फुलराणी (ब) अव्याज मने (क) संध्यावात (ड) रविकर

६१) "तो....... का गोजिरवाणा आवडला अमुच्या राणीला" असे बालकवी 'फुलराणी' कवितेत म्हणतात.

(अ) संध्यावात (च) रविकर (क) रजनीनाथ (ड) प्रणयभान

६२) फुलराणीचा वाङ्‌निश्चय करायला आकाशातून कोण चालते आहे बालकवी 'फुलराणी' कवितेत म्हणतात ?

(अ) दिव्य वऱ्हाडी (ब) चंडोल (क) संध्यावात (ड) मास्तरान्

६३) फुलराणीच्या लग्नासाठी मंगल पाठ कोण गात आहे असे बालकवी फुलराणी या कवितेत म्हणतात ?

(अ) सृष्टीचे गाणारे भाट (ब) मारुतराणा (क) कोकीळ (ड) संध्यावात

६४) फुलराणीच्या लग्नासाठी तानांवर ताना कोण घेत आहे असे बालकवी 'फुलराणी' कवितेत म्हणतात?

(अ) सृष्टीचे गाणारे भार (ब) कोकीळ (क) संध्यावात (ड) मारुतराणा

६५) फुलराणीच्या लग्नासाठी कोण नाचू लागले आहे असे बालकवी फुलराणी या कवितेत म्हणतात?

(अ) भारद्वाज (ब) कोकीळ (क) मारुतराणा (ड) संध्याक

६६) फुलराणीच्या लग्नासाठी पखवाज कोण वाजवत आहे असे बालक 'फुलराणी' कवितेत म्हणतात?

(अ) भारद्वाज (ब) कोकीळ (क) मारुतराणा (ड) निर्झर

प्रश्न २) दीर्घउत्तरी प्रश्न

१) ‘मानवांचा धर्म एक’ या खंडात महात्मा फुले यांनी कोणता विचार मांडला आहे?

२) धीर या खंडात महात्मा फुले यांनी कोणता विचार मांडला आहे?
३) सोनेरी रविकर आणि सुंदर फुलराणी यांच्या विवाहाचे वर्णन बालकवी यांनी कसे केले आहे? फुलराणी या कवितेच्या आधारे लिहा?
४) 'अप्सरानचे गाणे' या कवितेत बालकवींचे संवेदनशील मन कसे प्रकट झाले आहे?
५) संत नामदेवांची विठ्ठलभक्ती या विषयी थोडक्यात लिहा?
६) निसर्गातील विविध घटकांचे वर्णन बालकवींनी कोणत्या प्रकारे केले आहे ते स्पष्ट करा?
७) अनंत फंदिनी आपल्या लावणीतून पेशवेकालीन अनागोंदिचे चित्र कसे रेखाटले आहे ते स्पष्ट करा?
८) विठ्ठल दर्शनाने येणारा कैवल्याचा अनुभव नामदेवांनी कसा वर्णन केला आहे?
९) 'मानवता हा एकच धर्म असावा' असे आवाहन म. फुले यांनी आपल्या कवितेतून केले आहे ते स्पष्ट करा ?
१०) फुलराणीच्या विवाह वर्णनातील शब्दांचे मांगल्य बा कवींनी कसे रेखाटले आहे ते स्पष्ट करा ?

प्रश्न ३) दीर्घउत्तरी प्रश्न

१) 'माझ्या मना बन दगड' या कवितेत विंदा करंदीकर यांनी कोणती सामाजिक जाणीव व्यक्त केली आहे?
२) सांसारिक तिच्या चित्रण कवी विंदा करंदीकर यांनी 'झपताल' या कवितेत कसे केले आहे?
३) समाजातील शोषित व उपेक्षितांची व्यथा-वेदना 'गोधड' कवितेतून कशी व्यक्त केली आहे?
४) 'चळवळ म्हणजे काय? असे वाहरू सोनवणे चळवळ म्हणजे काय या कवितेत सांगतात?
५) स्त्रीबद्दलचे पुरुषांच्या मनातील नकारात्मक विचार प्रज्ञा दया पवार यांनी 'माणसासारखा माणूस असूनही कवितेत कसे व्यक्त केले आहेत?
६) पारंपारिक समाजव्यवस्थेत स्त्री पुढे कोणते दोनच पर्याय उपलब्ध आहेत असे प्रज्ञा दया पवार 'आग आणि फुफाटा' या कवितेत म्हणतात?
७) पोटापाण्यासाठी गावाकडून शहरात आलेल्या तरुणाची ही घुसमट 'शहर:एक उदास पोकळी' कवितेत कसे व्यक्त झाले आहे?
८) शहराच्या जीवनपद्धतीत गावाकडच्या माणसांची कोंडी होते त्याचे चित्रण शोधयात्रा कवितेत कसे केले आहे? तुमच्या शब्दात लिहा?
९) विंदा करंदीकर यांच्या 'झपताल' या कवितेमधील काव्यसुंदरता स्पष्ट करा?
१०) चळवळ म्हणजे माणुसकीचा गाभा असते? हे वाहरू सोनवणे यांनी 'चळवळ म्हणजे काय' या कवितेतून कसे सांगितले आहे?

प्रश्न ४) लघुत्तरी प्रश्न

१) निबंधाचे स्वरूप सांगून महत्व स्पष्ट करा.
२) निबंधाचे प्रमुख घटक कोणते आहेत कोणत्याही एका घटकाचा सविस्तर आढावा द्या.
३) निबंधाचे प्रकार कोणते आहे ते सांगून वर्णनात्मक निबंध या प्रकाराची माहिती द्या.
४) निबंधांचे प्रकार कोणते आहे ते सांगून वैचारिक निबंध या प्रकाराची माहिती द्या.
५) निबंधाचे प्रकार कोणकोणते आहेत ते सांगून कल्पनाप्रधान निबंध या प्रकाराची माहिती द्या.
६) निबंधाचे प्रकार कोणते आहेत ते सांगून आत्मवृत्तपर निबंध या प्रकाराची माहिती द्या.
७) निबंधाचे प्रकार कोणते आहे ते सांगा व्यक्तिचित्रणात्मक निबंध द्या प्रकारची माहिती द्या.
८) निबंधाचे प्रकार कोणते आहेत ते सांगून चरित्रात्मक निबंध या प्रकाराची माहिती द्या.
९) निबंधाचे प्रकार कोणते आहे ते सांगून लघुनिबंध या प्रकाराची माहिती द्या.
10) निबंध म्हणजे काय सांगून निबंधची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

प्रश्न ५) निबंध लेखन

१) झाडे जगवा पृथ्वी वाचवा
२) नको तो प्रवास
३) 21 व्या शतकातील आव्हाने
४) भ्रमणध्वनी शाप की वरदान
५) एका स्वातंत्र्य सैनिकाचे मनोगत
६) मी पाहिलेला अपघात
७) एक अविस्मरणीय सहल
८) प्रसार माध्यमे आणि मनोरंजन
९) सार्वजनिक गणेशोत्सव आदर्श आणि वास्तव
१०) शेतकऱ्यांच्या आत्महत्या
११) माझा अविस्मरणीय प्रवास
१२) एका झाडाचे आत्मवृत्त
१३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर
१४) महात्मा फुले: एक थोर समाज क्रांतिकारक
१५) रक्तदान हेच जीवनदान

[redacted]

[redacted]